# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:24.12.2024** **वार:मंगळवार**

---

1. पंतप्रधानांच्या हस्ते 71 हजारांपेक्षा जास्त युवक-युवतींना दूरस्थ पद्धतीनं नियुक्तीपत्र प्रदान
2. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील गरीबांसाठी यंदा 19 लाखांहून अधिक घरं देणार : केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांची घोषणा
3. परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर आजपासून सहा दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर
4. ज्येष्ठ चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक श्याम बेनेगल कालवश आणि
5. महिला क्रिकेटमध्ये भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यानचा मर्यादित षटकांचा दुसरा सामना आज वडोदरामध्ये

**रोजगार मेळावा**

गेल्या दीड वर्षांत सुमारे 10 लाख युवकांना सरकारी नोकरी मिळाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सांगितलं. केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांमध्ये आणि विभागांमध्ये नव्यानं रुजू होत असलेल्या 71 हजारांपेक्षा जास्त युवक युवतींना पंतप्रधानांच्या हस्ते काल दूरस्थ पद्धतीनं नियुक्तीपत्र वितरित करण्यात आली. पुणे आणि नागपूरसह देशभरात 45 ठिकाणी हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. नागपूरमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तर पुण्यामध्ये तळेगाव इथे सीआरपीएफ ग्रुप सेंटरमध्ये केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते विविध सरकारी विभागातील सुमारे 500 जणांना नियुक्तीपत्रांचं वितरण करण्यात आलं.

**मोदी**

समाजात हिंसाचार आणि असंतोष पसरवण्याचे प्रयत्न होतात तेव्हा मन व्यथित होतं, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. कॅथोलिक बिशप्स कॉन्फरन्स ऑफ इंडियाने नवी दिल्ली इथे काल आयोजित केलेल्या ख्रिसमस कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. काही दिवसांपूर्वी जर्मनीच्या ख्रिसमस मार्केटमध्ये झालेल्या हल्ल्याचा उल्लेख मोदी यांनी यावेळी केला. अशा आव्हानांचा सामना करण्यासाठी लोकांनी एकत्र येण्याचं आवाहन त्यांनी केलं. भारत आपल्या परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय हित आणि मानवी हित या दोन्ही गोष्टींना प्राधान्य देतो असं ते म्हणाले.

घरं चौहान

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील गरीबांसाठी 19 लाख 66 हजार घरं यंदा देण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल पुण्यात केली. किसान सन्मान दिवसाच्या निमित्ताने पुण्यातील कृषीविज्ञान केंद्रात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्र सरकारनं कृषी क्षेत्रासाठीची आर्थिक तरतूद वाढवली असल्याचं त्यांनी सांगितल. नैसर्गिक शेतीचं महत्त्व सांगताना चौहान म्हणाले....

या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुखउपस्थिती होती. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती अधिक समृद्धकरण्याची गरज असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**गोखले**

पुण्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या कृषि आर्थिक संशोधन केंद्राच्या 70 व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमातही कृषिमंत्री चौहान काल सहभागी झाले होते. भारताचं कृषीक्षेत्र इतर देशांच्या तुलनेत भक्कम असून या क्षेत्राला बळकटी देण्यासाठी केंद्र सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे, असं ते यावेळी म्हणाले.

**अमित शहा**

भारत विरोधी गट आणि संघटनांच्या कारवायांचा छडा लावण्यासाठी मित्र देशांच्या गुप्तचर यंत्रणाबरोबर समन्वयाचं धोरण विकसित करण्याची आवश्यकता असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. गुप्तचर संस्थेच्या शतकपूर्ती निमित्त आयोजित व्याख्यानमालेत ते काल नवी दिल्लीत बोलत होते. गुप्तचर संस्थेची कार्यपद्धती, दक्षता, सक्रियता, निर्णायक भूमिका आणि त्याग आणि समर्पणाची परंपरा यांच्यामुळे आज देश सुरक्षित आहे, असं शहा म्हणाले.

**ग्राहकॲप**

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ग्राहक व्यवहार विभागाच्या वतीने आज देशभरात अनेक नवे उपक्रम सुरू केले जाणार आहेत. यामध्ये ई-मॅप पोर्टल, एआय-सक्षम राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइन 2.0, जागो ग्राहक जागो ॲप, जागृती ॲप आणि जागृती डॅशबोर्डचा समावेश आहे. बनावट आणि फसव्या वेबसाइटना मज्जाव करण्याची क्षमता वाढवण्याच्या दृष्टीने याचा उपयोग होणार आहे. केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत या उपक्रमांचा प्रारंभ आज नवी दिल्ली इथे होणार आहे. ग्राहक न्यायासाठी डिजिटल सेवा, ही यंदाच्या राष्ट्रीय ग्राहक दिनाची संकल्पना आहे.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आजपासून सहा दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर जात आहेत. या अमेरिका भेटीदरम्यान ते अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्री आणि अन्य अधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय, प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा अपेक्षित आहे. अमेरिकेतील भारताच्या काउन्सुल जनरल्सच्या परिषदेचं अध्यक्षपदही भूषवतील.

**मानवाधिकार आयोग**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षपदी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती व्ही. रामसुब्रमण्यम यांची नियुक्ती केली आहे. प्रियांक कानूनगो आणि निवृत्त न्यायमूर्ती डॉ. विद्युत रंजन सारंगी यांचीही सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

**प्रजासत्ताक दिन**

येत्या 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीतील संचलनात सहभागी होणाऱ्या चित्ररथांसाठी 'स्वर्णिम भारत - वारसा आणि विकास' ही मुख्य संकल्पना ठेवण्यात आली आहे. यंदा 15 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांसह 11 मंत्रालयं आणि केंद्र सरकारचे काही विभाग यांची चित्ररथांसाठी निवड करण्यात आल्याची माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली आहे.

**गडकरी धावपट्टी-नागपूर**

नागपूर इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील नवीन धावपट्टीचं काम एका महिन्याच्या आत पूर्ण करावं, अन्यथा संबंधित कंपनीवर कारवाई करण्याचा इशारा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग

मंत्री नितीन गडकरी यांनी दिला आहे. गडकरी यांनी धावपट्टीच्या कामाची काल पाहणी केली आणि या कामाला वेळ लागत असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

**खलिस्तानी अटक**

पंजाबमधील दहशतवादी कट प्रकरणातील खलिस्तानी दहशतवादी लखबीर सिंग आणि गॅंगस्टर बचितर सिंग यांच्या प्रमुख साथीदाराला राष्ट्रीय तपास संस्थेने मुंबईत अटक केली आहे. अटक करण्यात आलेला जतिंदर सिंग हा बब्बर खालसा इंटरनॅशनल या प्रतिबंधित दहशतवादी संघटनेचा सदस्य आहे. जतिंदर सिंग पंजाबमधील लखबीर आणि बचितरच्या दहशतवादी टोळीला शस्त्रे पुरवत होता.

**श्याम बेनेगल निधन**

ज्येष्ठ चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक श्याम बेनेगल यांचं काल मुंबईत निधन झालं. ते 90 वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर मुंबईतल्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते; उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. समांतर चित्रपटांची धुरा वाहणारे खंदे निर्माते दिग्दर्शक अशी ओळख असलेले श्याम बेनेगल यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात जाहिरात क्षेत्रापासून केली. त्यानंतर जवळ जवळ एका दशकानंतर त्यांनी दिग्दर्शित केलेल्या अंकुर या पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. मंथन, भूमिका यासारख्या त्यांच्या अनेक चित्रपटांनीही राष्ट्रीय पुरस्कार मिळवले. चित्रपट क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं. 'भारत एक खोज' सारखी दूरचित्रवाणीवरील मालिका, माहितीपट, लघुपट आणि चरित्रपटांबरोबरच काही व्यावसायिक चित्रपटही त्यांनी केले. मुजीब द मेकिंग ऑफ नेशन हा त्यांनी दिग्दर्शित केलेला अखेरचा चित्रपट ठरला. त्यांच्या निधनानं कला क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना व्यक्त होत आहे. राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यानीही श्याम बेनेगल यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये, भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यान मर्यादित षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज होणार आहे. वडोदरा इथल्या कोटंबी मैदानावर दुपारी दीड वाजता हा सामना सुरू होईल. पहिल्या सामन्यात भारताने वेस्ट इंडिजचा 211 धावांनी पराभव करत तीन सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार